प्रेसनोट दिनांक ११/०४/२०२५.

**सोलापूर शहर पोलीस आयुक्तांकडून, ०१ कोटी ६५ लाख रूपयांचा मुद्देमाल फिर्यादींना परत.**

---

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर हद्दितील विविध पोलीस ठाणेस, सन २०२४ व सन २०२५ मध्ये दाखल असलेल्या, घरफोडी-चोरीचे घटनेमध्ये, फिर्यादी यांचे चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने, त्यांना परत करणेचा कार्यक्रम दिनांक ११/०४/२०२५ रोजी, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करणेत आला होता.

त्याप्रमाणे, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर घटकातील सर्व पोलीस ठाणे अभिलेखावरील मालाविषयक उघडकीस आलेल्या एकूण- १५ गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल त्यामध्ये, ११०० ग्रॅम सोन्याचे दागिने व १००० ग्रॅम चांदीचे दागिने असा एकुण ०१ कोटी रूपये किंमतीचे दागिने, संबंधीत फिर्यादी यांना नियमानुसार परत करणेत आले आहेत. त्याचप्रमाणे, सायबर पोलीस ठाणे कडील विविध घटनेत सायबर फ्रॉडला बळी पडलेल्या ०८ व्यक्तींचे सुमारे ६५ लाख रूपये हे त्यांना परत करणेत आले आहेत. अशा प्रकारे, एकूण २३ व्यक्तींचे सुमारे ०१ कोटी ६५ लाख रूपये किंमतीचा ऐवज, मा.एम राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी परत केला आहे.

सदर मुद्देमाल परत करणेचे कार्यक्रमास, मा. श्री. एम राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, श्री. अजित बोऱ्हाडे, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, श्री. विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ, तसेच, संबंधीत विभागाचे सहायक पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा व सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व मुद्देमाल कारकुन उपस्थीत होते.






